मूळप्रत

सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ

यांचे कार्यालय

कार्यालय - कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

---

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 कसाल ते झाराप

(कि.मी.419/800 To 450/170)

# :: भूसंपादन पुरवणी निवाडा ::

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) कलम 3G (1)

अन्वये नुकसान भरपाई आदेश

## भुसंपादन प्रकरण क्रमांक 17/2014

| | |
|---|---|
| मुल्यांकन दिनांक | :- सन 2016 |
| आदेश दिनांक | :- 31/08/2018 |
| गावाचे नांव | :- जांभरमळा |
| तालुका | :- कुडाळ |
| जिल्हा | :- सिंधुदुर्ग |

**वाचले :-**

1) प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (सडक परिवहन व राज्यमार्ग मत्रालय भारत सरकार) यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.17 राजापूर ते झाराप (NH-66) कि.मी. 351.00 ते 450.170 विस्तारीत करण्यासाठी व नामनिर्देशन करणेसाठीचे पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. 16026/140/2013-COLL-REV दि.19/09/2013 नुसार भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरिता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते.
2) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(a) अन्वये राज्यमार्ग व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र. का.आ.39(अ)अधिसूचना प्रसिद्ध दिनांक 7 जानेवारी 2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग 17 (नविन-66) करिता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.
3) कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बां.विभाग, रत्नागिरी यांचेकडील पत्र क्रमांक जावक क्र.दरवि/प्रशा/चौप./भूसंपादन/476, दि.24/02/2014 अन्वये मौजे-जांभरमळा, ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग जमीन संपादनाबाबतचा प्रस्ताव.
4) राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(A) पुरवणी अधिसूचना का.आ.4073(अ) प्रसिद्ध दिनांक 16/12/2016 व कलम 3(A) पुरवणी अधिसूचना का.आ.4074(अ) प्रसिद्ध दिनांक 16/12/2016.
5) सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) पुरवणी अधिसूचना का.आ.3853(अ) प्रसिद्ध दिनांक 08/12/2017.
6) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन/भूसंपादन/रा.म.मा.-66/2016/750, दि.4/03/2016, मो.र.नं.142 दि.27/03/2015 अन्वये मौजे जांभरमळा ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील प्राप्त झालेले संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट.
7) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन/रा.म.मा.-66/जांभरमळा 2017/1933, दि.11/08/2017अन्वये मौजे जांभरमळा येथील प्राप्त झालेला अहवाल

8) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन/रा.म.मा.-66/जांभरमळा 2018/237, दि.07/02/2018 अन्वये मौजे जांभरमळा येथील प्राप्त झालेला अहवाल

9) उपअधिक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन/रा.म.मा.-66/जांभरमळा 2018/1190, दि.25/05/2018 अन्वये मौजे जांभरमळा येथील प्राप्त झालेला अहवाल

10) उपविभागीय कृषी अधिकारी, सावंतवाडी यांजकडील पत्र जा.क्र./उविकृअसा/तंत्र/विस्तार/फमु/1059/2018, दि.07/07/2018 अन्वये संपादीत जमिनीवरील फळझाडे मुल्यांकन अहवाल.

11) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सार्वजनिक बांधकाम उपविभाग मालवण, यांजकडील दि.07/04/2018 व दिं.07/07/2018 रोजी प्राप्त झालेला बांधकामाचा मुल्यांकन अहवाल.

12) उपसचिव महाराष्ट्र शासन यांजकडील पत्र क्र.संकिर्ण-10/2015/प्र.क्र.133/अ2 महसूल व वनविभाग, दि.05/10/2015.

13) कलम 3(A) नुसार अधिसूचना प्रसिद्धी राजपत्र दिनांक-16/12/2016 व दैनिक सिंधुदुर्ग टाईम्स व दैनिक पुढारी वृत्तपत्र दिनांक 04/03/2017.

14) कलम 3C नुसार प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने आक्षेपअर्जावर सुनावणी दिनांक 17/05/2017.

15) भारतीय राजमार्ग प्राधिकरण नवि दिल्ली यांचे पत्र क्र. NHAI/110/03/dgm(L.A.& Coord)2015/FTS-417/70689 दि.24/08/2015.

16) क्र.एल.क्यू.एन/12/2013प्र.क्र.190/अ2 ज्या अर्थी भूमिसंपादन , पुनवर्सन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013चा 30) महसुल व वनविभाग मुंबई अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 अ मधील असाधारण क्रमांक 70 दि. 25 मे 2015.

17) नगररचनाकार सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र. जा.क्र.भूसंपादन/कुडाळ रा.म.मा.क्र.66/ गुणांक/ नरसी 989 दि. 17/05/2018

18) महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. संकिर्ण-01/2018 प्र.क्र.-11/अ-2दि. 04/04/2018

19) भारत सरकार, Ministry of Road Transport & Highway यांजकडील पत्र क्रमांक No.NH-11011/30/2015LA दि.28/12/2017 (GUIDELINES)

20) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडील पत्र क्र. जा.क्र.नर/निवाडा शाखा/पो.ख./धारणा कायम/2016/142 दिं. 19/10/2016

भारत सरकार साठी करावयाच्या भूसंपादना करिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे (1956 चा कायदा 48) कलम 3G अन्वये डॉ. विकास सुर्यवंशी उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांनी तयार केलेला निवाडा.

# भूसंपादन निवाडा

क्र.उविअ/रा.म.मा.66/भूसं.एसआर नं.17/जांभरमळा/2018
सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसुल)
कुडाळ, दिनांक : 31/08/2018

**भारत सरकार साठी लागू असलेले भुसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे (1956 चा कायदा 48) कलम 3G अन्वये निवाडा**

**विषय :-** **भुसंपादन जिल्हा सिंधुदुर्ग**
**भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र.66 चौपदरीकरणासाठी भूसंपादन**
**मौजे जांभरमळा, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**

1) भुसंपादन प्रस्ताव :-

प्रस्तुत प्रकरणी संपादन संस्था कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बा.विभाग, रत्नागिरी असून भुसंपादन मोबदला निधी न्यायालय खर्च तसेच तदअनुषंगीक इतर सर्व खर्च देणेसाठी संपादन संस्था म्हणून कार्यकारी अभियंता, दक्षिण सा.बा.विभाग, रत्नागिरी यांचेवर बंधनकारक होईल.

## 1) 3(a) अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 राजापुर ते झाराप (किमी-351/000 ते 450/170) विस्तारीत करण्यासाठी नामनिर्देशन करणेसाठी मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे पत्र.क्र. 16026/140/2013-COLL-REV दि.19/09/2013 अन्वये भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याकरीता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांचे नामनिर्देशन अधिसूचीत करणेसाठी कळविणेत आले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(a) अन्वये राज्यमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील क्र. का.आ.39 (अ) अधिसूचना प्रसिद्ध दिनांक 7/01/2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 करीता उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

## 2) सक्षम प्राधिकारी :-

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांजकडील पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 (जुना 17) राजापूर ते झाराप (कि.मी. 351/000 ते 450/170) हद्दी मधील मौजे कसाल ते झाराप तालूका कुडाळ पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण, चौपदरीकरण करणेसाठी भूसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांना प्राधिकृत केलेले आहे.

## 3) प्रस्ताव :-

कार्यकारी अभियंता दक्षिण सा.बा.विभाग रत्नागिरी यांचेकडील पत्र क्र. जावक क्र.दरवि/प्रशा/चौप./भूसंपादन/476, दि.24/02/2014 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र.66 च्या रूंदीकरणासाठी आवश्यक जमिनीचा मौजे जांभरमळा ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग या गावातील भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

## 4) कलम 3 (A) पुरवणी अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3A पुरवणी अधिसूचना राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहनं विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये का.आ. 4073 (अ) दिनांक 16/12/2016 व क्र. का.आ. 4074 (अ) दिनांक 16/12/2016 रोजी प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आली.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिद्धी कार्यालयाचे नाव | प्रसिद्धीचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | दैनिक 'सिंधुदुर्ग टाईम्स' | 04/03/2017 |
| 2 | दैनिक 'प्रहार' | 04/03/2017 |
| 3 | उपविभागीय अधिकारी (महसूल)कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | 04/03/2017 |
| 4 | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर | 10/03/2017 |
| 5 | तहसिल कार्यालय, कुडाळ नोटीस बोर्डावर | 14/03/2017 |
| 6 | तलाठी कार्यालय, साळगांव नोटीस बोर्डावर | 09/03/2017 |
| 7 | संपादन संस्था कार्यालय नोटीस बोर्डावर | 10/03/2017 |
| 8 | ग्रामपंचायत कार्यालय साळगांव नोटीस बोर्डावर | 09/03/2017 |

## 5) कलम 3 (C) नुसार चौकशी :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा कायदा 48) चे कलम 3A (1) अन्वये प्राथमिक पुरवणी अधिसुचना दिनांक 16/12/2016 राजपत्रात व स्थानिक वर्तमानपत्रात दिनांक 04/03/2017 रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर या अधिनियमाच्या कलम 3-C (1) अन्वये 21 दिवसांत जमिनधारक हितसंबंधित व्यक्तींनी हरकती दाखल करणेसाठी कळविण्यात आले होते. परंतू सदर गावात एकाही हितसंबंधीत असामीकडून हरकत उपस्थित करणेत आलेली नाही. त्यामुळे सुनावणी लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

## 6) कलम 3 (D) पुरवणी अधिसूचना :-

राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(D) पुरवणी अधिसूचना का.आ.3853(अ) प्रसिद्ध दिनांक 08/12/2017.

## 7) कलम 3 (D) नुसार अधिसूचना प्रसिद्धी :-

परिच्छेद 4 मध्ये नमूद केलेला अहवाल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सडक परिवहन राजमार्ग, मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3D नुसार अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी अहवाल सादर केला. त्यानुसार राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3(D) पुरवणी अधिसूचना का.आ.3853(अ) दिनांक 08/12/2017 रोजी प्रसिद्ध केली. संयुक्त मोजणी पत्रकामध्ये दर्शविलेप्रमाणे **एकूण 2-57-90 हे.आर.** क्षेत्र प्रस्तावीत क्षेत्र असून यापूर्वीच्या निवाडयात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3D अधिसूचनेव्दारे **एकूण 2-36-10 हे.आर**. क्षेत्र अधिसूचित झाले असून त्याचे निवाडयाद्वारे मोबदला वाटप करणेत आलेले आहे. उर्वरीत प्रस्तावीत क्षेत्राची कलम 3A प्रमाणे पुरवणी अधिसूचना मंजूर झालेली असून त्याची कलम 3D पुरवणी अधिसूचना **0-21-80 हे.आर.** क्षेत्राची प्रसिद्ध झालेली आहे. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3(D) अन्वये अधिसूचित करणेत आलेल्या व अंतिमरित्या संपादीत करावयाच्या जमिनीचा तपशिल सोबत परिशिष्ट-2 मध्ये देण्यात आला आहे. सदर अधिसूचना सिंधुदुर्ग जिल्हातील दोन स्थानिक वृत्तपत्रात व शासकीय कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्र व प्रसिध्दी कार्यालयाचे नांव | प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|
| 1 | दैनिक 'प्रहार' (मराठी) | 10/01/2018 |
| 2 | दैनिक 'पुढारी' (मराठी) | 10/01/2018 |
| 3 | उपविभागीय अधिकारी (महसूल)कुडाळ कार्यालय नोटीस बोर्डावर | 18/01/2018 |
| 4 | जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर | 24/01/2018 |
| 5 | तहसिलदार कार्यालय,कुडाळ नोटीस बोर्डावर | 23/01/2018 |
| 6 | तलाठी कार्यालय, साळगांव नोटीस बोर्डावर | 19/01/2018 |
| 7 | ग्रामपंचायत कार्यालय साळगांव नोटीस बोर्डावर | 19/01/2018 |
| 8 | संपादन संस्था, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, राष्ट्रीय महामार्ग रत्नागिरी | 24/01/2018 |

## 8) कलम 3 (G) 3 नोटीस व चौकशी :-

संपादित जमिनीत हितसंबंधित असणा-या सर्व हितसंबंधित व्यक्तींना उक्त दोन वृत्तपत्राव्दारे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3G पोट कलम 3 अन्वये हितसंबंधितांच्या असणा-या हक्कांचे स्वरुप व नुकसान भरपाई संदर्भातील त्यांच्या मागण्या संबंधीचे निवेदन घेवून दि. 31/01/2018 रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल), कुडाळ यांचे कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत नोटिस देण्यात आली होती. परंतू सदर तारखेला कोणीही हितसंबंधीत असांमीनी आपल्या निवेदनाव्दारे संपादनाखालील जमिनीची प्रतीआर दराबाबत मागणी केलेली नाही.

## 9) संयुक्त मोजणी :-

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 रस्ता रुंदीकरण मौजे-जांभरमळा, ता. कुडाळ येथील भूसंपादन प्रस्तावातील जमिनीची संयुक्त मोजणी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कुडाळ व संपादन संस्थेचे प्रतिनीधी यांनी केली आहे. सदर मोजणी नुसार मौजे - जांभरमळा, ता.कुडाळ येथील **एकूण 2-57-90 हे.आर.** जमीन संपादित होत आहे. दि. 30/11/2016 रोजी 2.36.10 हे.आर क्षेत्राचा निवाडा घोषीत करणेत आलेला असून उर्वरीत **0.21.80** हे. आर क्षेत्र या निवाडयात समाविष्ठ आहे. संयुक्त मोजणी पत्रक व नकाशाशीट या कार्यालयाकडे त्यांचेकडील पत्र क्र. भूमापन/भूसंपादन/रा.म.मा.-66/2016/750 दि.4/03/2016 अन्वये पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला आहे. उपअधिक्षक भूमी अभिलेख, कुडाळ व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे सर्वे नंबर/गट नंबर व क्षेत्र मान्य करण्यात आले आहे.

# परिशिष्ठ अ

## गांव - जांभरमळा, तालुका - कुडाळ

| अ.नं. | संयुक्त मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर.) | | मागिल निवाडयात समाविष्ठ करणेत आलेले क्षेत्र (हे.आर.) | | (पुरवणी क्र.1) कलम 3A नुसार प्रसिद्ध झालेले क्षेत्र (हे.आर.) | | (पुरवणी क्र.1) कलम 3D नुसार प्रसिद्ध झालेले क्षेत्र (हे.आर.) | | (पुरवणी क्र.1) सदरच्या निवाडयामध्ये समाविष्ठ करावयाचे क्षेत्र (हे.आर.) | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स.नं./हि.नं. | क्षेत्र | स.नं./हि.नं. | क्षेत्र | स.नं./हि.नं. | क्षेत्र | स.नं./हि.नं. | क्षेत्र | स.नं./हि.नं. | क्षेत्र | |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| | **एकूण** | **2.57.90** | **एकूण** | **2.36.10** | **एकूण** | **0.21.80** | **एकूण** | **0.21.80** | **एकूण** | **0.21.80** | |
| 1 | 117/27 पै | 0.16.00 | 117/27 पै | -- | 117/27 पै | 0.16.00 | 117/27 पै | 0.16.00 | 117/27 पै | 0.16.00 | |
| 2 | 124/12 | 0.00.20 | 124/12 | -- | 124/12 | 0.00.20 | 124/12 | 0.00.20 | 124/12 | 0.00.20 | |
| 3 | 124/13 पै | 0.01.60 | 124/13 पै | -- | 124/13 पै | 0.01.60 | 124/13 पै | 0.01.60 | 124/13 पै | 0.01.60 | |
| 4 | 127/7 पै | 0.05.70 | 127/7 पै | 0.01.70 | 127/7 पै | 0.04.00 | 127/7 पै | 0.04.00 | 127/7 पै | 0.04.00 | |
| | | | | | | **0.21.80** | | **0.21.80** | | **0.21.80** | |

1) वरील प्रपत्रातील 3(D) प्रमाणे संपादन करावयाचे स.नं./हि.नं. व क्षेत्र रकाना क्र.8 व 9 प्रमाणे आहे.

**(परिशिष्ट 1)**

| अ.क्र. | एस.आर.क्र. | गावाचे नांव | एकुण संपादीत क्षेत्र हे.आर. | | मोजणी रजिस्टर नं. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 17/2014 | जांभरमळा | खरीप<br>वरकस<br>अकृषिक | 0-84-60<br>1-64-60<br>0-08-70 | 142/2015 |
| | | | **एकुण** | **2-57-90** | |

## 10) मालकी हक्क व स्थळ पहाणी : -

राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 कसाल ते झाराप हद्दीमधील मौजे जांभरमळा, ता. कुडाळ रस्त्याचे रूंदीकरण, चौपदरीकरणासाठी कलम 3 (D) अधिसूचना, संयुक्त मोजणी अहवाल जायमोक्यावर स्थळपहाणी मौजे जांभरमळा, ता. कुडाळ दि. 27/03/2015 रोजी करणेत आली. संपादित होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (7/12) नोंदी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्टींय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 H (4) प्रमाणे कार्यवाही करणेत येईल. उक्त अधिनियमाचे कलम 3D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहे. तथापी काही मालमत्तेसंदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्का बाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल त्यां आदेशानुसार नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल.

## 11) आक्षेप व मागण्या :-

प्रस्ताव पाठविणाऱ्या संसथेकडून कुठल्याही प्रकारची मागणी किंवा आक्षेप नाही. तसेच बाधीत शेतकऱ्यांचे संयुक्त मोजणी संबंधी व जमिनीच्या मुल्यांकनासंबंधी सबळ पुराव्यासह राष्ट्रीय महामार्ग अधिनियम कलम 3A व 3G संदर्भाने एकही आक्षेप आला नाही. त्याअनुषंगाने मौजे जांभरमळा ता. कुडाळ येथील प्रकरणात या कार्यालयाने कलम 3G च्या आक्षेप सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्यावेळी व त्यानंतर कोणतेही सबळ पुरावे दाखल झाले नाहीत.

## 12) बाजार मुल्य (Market Value) निश्चित करणे -

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 च्या रुंदीकरण/ चौपदरीकरणासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 मधील तरतूदीप्रमाणे करणेत येत आहे. सदर संपादीत जमिन राष्ट्रीय राज्य महामार्ग क्र.66 (जूना 17) मुंबई ते गोवा रोडच्या लगत असल्याने रहिवास व्यापार व औद्योगीक दृष्टया महत्वाचे आहे. हायवेलगतच्या जमिनीचे महत्व रस्त्यावरील सोई सुविधा या दृष्टीकोनातून वाढत आहेत. संपादनाखालील सर्व जमिनी हायवेमार्गावरील व लगत असल्याने त्याचे मुल्यांकन निश्चीत करतांना हायवेमार्गालगतच्या जमिनीचे शेती, रहिवास, व्यापार, औद्योगीक वापर या दृष्टीकोनातून महत्व विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच अधिकृत व संभाव्य बिनशेती शमता व 7/12 वरून खरीप, हंगामी बागायत व अकृषीक जमिनीबाबत इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे.

## 13) जमिनीचे दर :-

मौजे जांभरमळा, ता. कुडाळ, जि. सिधुदुर्ग या गावचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामिण क्षेत्रातील माहिती तक्त्यामध्ये सदरचा गांव मुल्यविभाग क्र.4 तपशीलाप्रमाणे मुल्यदर तक्त्यामध्ये शेतसारा हेक्टरी आकारणीनुसार (गटानुसार) प्रतिहेक्टरी जिरायत शेत जमिनीचे दर दिलेले आहेत. खरीप अथवा वरकस तसेच हंगामी बागायतीसाठी दर दिले नसल्यास जिरायत शेतजमिनीच्या दिडपट दर खरीप जमिनीस व 75% दर वरकस जमिनीस विचारात घेणेबाबत सुचना आहेत.

मौजे जांभरमळा, ता.कुडाळ येथील जमीनी राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरणासाठी संपादित होत असून, सदर गाव कुडाळ या तालुक्याचे ठिकाणापासून 10 कि.मी. च्या आत आहे. कुडाळ नगरपंचायत व रेल्वेस्टेशनपासून 10 कि.मी. अंतराच्या आत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित असून, गोवा या पर्यटन दृष्टया जागतिक महत्व असलेल्या राज्याला लागून आहे. कुडाळपासून सुमारे 20 km. अंतरावर चिपी विमानतळ होऊ घातलेले आहे व अल्पावधीतच त्याचे काम पूर्ण होणार आहे. तसेच लगतच्या मालवण तालुक्यामध्ये ' समुद्रविश्व प्रकल्प ' नावारूपाला येत आहे. जवळच कुडाळ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक प्रकल्प आहेत. व्यापक औद्योगिक क्षमता असून, महामार्ग भोवतालच्या क्षेत्रात येवू घातलेल्या हॉटेल, व्यवसाय, उद्योग धंद्यामुळे महामार्ग लगतच्या सर्व जमिनींना अनन्य साधारण महत्व आले आहे. व या सर्व क्षेत्रातील शेतजमिनी देखील अमर्याद अकृषिक संभावनांच्या क्षमता धारण करतात.

राष्ट्रीय महामार्ग क्र.66 साठी प्रस्तूत संपादित क्षेत्र हे महामार्गाच्या दुतर्फा आहे. जमिनीस व्यापक औद्योगिक व अकृषिक क्षमता आहे. सदर जमिनी या हायवेलगत असल्याने हायवेलगताच्या जमिनीचा दर देणे योग्य होईल. मौजे जांभरमळा, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग या गांवचे शिघ्रसिद्ध गणक दर ग्रामिण क्षेत्रातील सन 2016 च्या माहिती तक्त्यामध्ये सदरचा गांव मुल्य विभाग क्रमांक 4 तपशीलाप्रमाणे हायवेवरील जमिनीचा दर प्रती आर दर रूपये 86,000/- एवढा आहे.

मौजे - जांभरमळा मधील सर्व प्रकारच्या जमिनीसाठी खरीप व वरकस जमिन व डोंगरीबागायत ग्रुप क्रं. I,IV साठी दरांची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>मौजे - जांभरमळा येथील जमिनीचा प्रती आर दर तक्ता व माहिती</u>**

| अ.क्र. | जमिनीचा प्रकार | संपादित होणाऱ्यां जमीनीचे स.नं./हि.नं. | गटाचे एकुण क्षेत्र हे. आर. | आकार | ग्रुप क्र. | दर रूपये प्रति आर |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | जिरायत शेत जमिन | 117/27, 124/12 | 0.16.20 | 0 ते 1.25 | I | 3143 |
| 2 | जिरायत शेत जमिन | 124/13, 127/7 | 0.05.60 | 5.01 ते 7.50 | IV | 5000 |
| 3 | हायवेलगत जमिनी | 117/27, 124/12, 124/13, 127/7 | | | | 86000 |
| 8 | बिनशेती जमिनी | निरंक | -- | -- | -- | 75000 |

## 13A) खरेदी विक्री प्रमाणे दर :-

सदरची जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र.66 चे रस्ता रुंदीकरणासाठी संपादन करण्यात येत आहे. संपादित जमिनीचे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3A अधिसूचना Minishtry of Road Transport and Highway Notification New Delhi S.O.4073 (अ) दि.16/12/2016 व S.O.4074 (अ) दि.16/12/2016 रोजी प्रसिध्दी केली आहे. मुल्यांकनासाठी दि. 16/12/2016 ही तारीख आधारभूत धरण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र.NHAI/11013/dgm (L.A & Coord) 2015/FTS-

417/70689, दि.24/08/2015 व पत्र क्र.संकिर्ण-10/2015/प्र.क्र.133/अ-2, दि.05/10/2015 अन्वये कळविणेत आलेप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 नुसार संपादित करावयाच्या जमिनीसंदर्भात मुल्यांकन करताना नवीन भूसंपादन कायद्यातील फक्त मोबदला परिगणित करण्याबाबतच्या कलम 26 ते 30 च्या तरतूदी लागू असून, उर्वरित कार्यपध्दती ही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या तरतूदीनुसार करणे अपेक्षित आहे, असे कळविणेत आल्याने सदर तारखेपासूनचे मागील तीन वर्षाचे मौजे- जांभरमळा या गावाचे खरेदी विक्री व्यवहार सन 2013, 2014 व 2015 या वर्षाचे दुय्यम निबंधक, कुडाळ यांजकडून मागविण्यात आलेले आहेत. तसेच शिघ्रसिध्द गणक दर सन 2013 ते 2015 या वर्षीचे मागविणेत आले आहेत. मागील तीन वर्षात मौजे- जांभरमळा या गावी 11 खरेदी विक्री व्यवहार झालेले आहेत. त्यापैकी 4 खरीप भातशेतीचे व 7 वरकस प्रतीचे असे मिळून 11 खरेदी विक्री व्यवहार झाले आहेत. सदर गांवी बिनशेतीचे खरेदी विक्री व्यवहार झालेले नाहीत.

**खरेदी विक्री व्यवहारांचे विवरण.**

| अ. क्रं. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रति आर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 821/2013 | खरेदीखत | 133/3<br>134/1 | 0.51.00<br>0.45.80 | 0.19 | खरीप<br>खरीप | 09/01/2013 | 4,94,000 | 5,103 |
| 2 | 836/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | खरीप | 18/02/2013 | 3,92,000 | 56,000 |
| 3 | 844/2013 | खरेदीखत | 96/18 | 0.18.00 | 0.12 | वरकस | 19/07/2013 | 2,18,000 | 12,111 |
| 4 | 848/2013 | खरेदीखत | 154/18 | 0.09.90 | 0.39 | वरकस | 30/07/2013 | 80,000 | 8,081 |
| 5 | 871/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | वरकस | 17/09/2013 | 4,00,000 | 57,143 |
| 6 | 1448/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 10/07/2014 | 18,00,000 | 72,000 |
| 7 | 194/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 24/01/2014 | 5,00,000 | 20,000 |
| 8 | 903/2015 | खरेदीखत | 118/6<br><br>118/7 | 0.53.00<br>पो. 0.13.00<br>0.56.00<br>पो. 0.13.00 | 0.11<br><br>0.11 | वरकस | 24/04/2015 | 25,00,000 | 18,519 |
| 9 | 908/2015 | खरेदीखत | 150/97 | 0.04.60<br>पो. 0.00.20 | 0.08 | खरीप | 11/06/2015 | 50,000 | 10,417 |
| 10 | 910/2015 | खरेदीखत | 96/10 | 0.08.00 | 0.05 | वरकस | 25/03/2015 | 1,36,000 | 17,000 |
| 11 | 929/2015 | खरेदीखत | 137/50 | 0.04.30<br>पो.0.00.20 | 0.16 | खरीप | 25/01/2015 | 2,00,000 | 44,444 |

वरील प्रमाणे एकूण 11 खरेदी-विक्री व्यवहार असून त्यापैकी 4 खरीप प्रतीचे आहेत. नवीन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 मधील तरतूदीनुसार सदरचे व्यवहार प्रतीआर दरानुसार खालील प्रमाणे उतरत्या क्रमाने घेण्यात आले.

## गांव - जांभरमळा , ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 836/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | खरीप | 18/02/2013 | 3,92,000 | 56,000 |
| 2 | 929/2015 | खरेदीखत | 137/50 | 0.04.30<br>पो.0.00.20 | 0.16 | खरीप | 25/01/2015 | 2,00,000 | 44,444 |
| 3 | 908/2015 | खरेदीखत | 150/97 | 0.04.60<br>पो. 0.00.20 | 0.08 | खरीप | 11/06/2015 | 50,000 | 10,417 |
| 4 | 821/2013 | खरेदीखत | 133/3<br>134/1 | 0.51.00<br>0.45.80 | 0.19 | खरीप<br>खरीप | 09/01/2013 | 4,94,000 | 5,103 |

वरील प्रमाणे एकूण खरीप व्यवहारापैकी निम्मे उच्चतम किंमतीचे व्यवहार विचारात घेवून खरीप प्रतीचा प्रतीआर दर खालील प्रमाणे निश्चीत करणेत आला.

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 836/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | खरीप | 18/02/2013 | 3,92,000 | 56,000 |
| 2 | 929/2015 | खरेदीखत | 137/50 | 0.04.30<br>पो.0.00.20 | 0.16 | खरीप | 25/01/2015 | 2,00,000 | 44,444 |
| | | | **एकूण** | **0.11.50** | | | | **5,92,000** | |

**5,92,000 ÷ 0.11.50 = 51,478/- प्रती आर दर**

वरकस प्रतीचा दर ठरविणेसाठी एकूण 7 खरेदी विक्री व्यवहार उपलब्ध आहेत. नवीन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 मधील तरतूदीनुसार सदरचे व्यवहार प्रतीआर दरानुसार खालील प्रमाणे उतरत्या क्रमाने घेण्यात आले.

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1448/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 10/07/2014 | 18,00,000 | 72,000 |
| 2 | 871/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | वरकस | 17/09/2013 | 4,00,000 | 57,143 |
| 3 | 194/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 24/01/2014 | 5,00,000 | 20,000 |
| 4 | 903/2015 | खरेदीखत | 118/6<br>118/7 | 0.53.00<br>पो. 0.13.00<br>0.56.00<br>पो. 0.13.00 | 0.11<br>0.11 | वरकस | 24/04/2015 | 25,00,000 | 18,519 |
| 5 | 910/2015 | खरेदीखत | 96/10 | 0.08.00 | 0.05 | वरकस | 25/03/2015 | 1,36,000 | 17,000 |
| 6 | 844/2013 | खरेदीखत | 96/18 | 0.18.00 | 0.12 | वरकस | 19/07/2013 | 2,18,000 | 12,111 |
| 7 | 848/2013 | खरेदीखत | 154/18 | 0.09.90 | 0.39 | वरकस | 30/07/2013 | 80,000 | 8,081 |

वरील प्रमाणे एकूण वरकस व्यवहारापैकी निम्मे उच्चतम किंमतीचे व्यवहार विचारात घेवून वरकस प्रतीचा प्रतीआर दर खालील प्रमाणे निश्चीत करणेत आला.

| अ. क्र. | परि.अ. मधील अ.नं. | प्रकार | स.नं./ हि.नं. | खरेदी क्षेत्र | आकार | जमिनीची प्रत | विक्रीचा दिनांक | खरेदी किंमत | प्रतिआर दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1448/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 10/07/2014 | 18,00,000 | 72,000 |
| 2 | 871/2013 | खरेदीखत | 125/46 | 0.07.00 | 0.03 | वरकस | 17/09/2013 | 4,00,000 | 57,143 |
| 3 | 194/2014 | खरेदीखत | 118/10 | 0.25.00 | 0.06 | वरकस | 24/01/2014 | 5,00,000 | 20,000 |
| 4 | 903/2015 | खरेदीखत | 118/6<br><br>118/7 | 0.53.00<br>. पो. 0.13.00<br>0.56.00<br>पो. 0.13.00 | 0.11<br><br>0.11 | वरकस | 24/04/2015 | 25,00,000 | 18,519 |
| | | | एकूण | 1.92.00 | | | | 52,00,000 | |

**52,00,000 ÷ 1.92.00 = 27,083/- प्रती आर दर**

संपादित क्षेत्रात अकृषिक क्षेत्राचा समावेश नाही. अकृषिक क्षेत्राचा दर ठरविणेसाठी अकृषीक क्षेत्राचे खरेदी विक्री व्यवहार उपलब्ध नाहीत. सन 2016 सालचे विभागवार मुल्यदरसूची पाहता सदरचा गांव हा विभाग क्र.4 मध्ये मोडतो. सदर विभागामध्ये शिघ्रसिद्ध गणक दराप्रमाणे अकृषीक क्षेत्राचा प्रती आर दर रू. 75,000/- येत आहे. सदरचा दर हा संपादित क्षेत्रातील बिनशेती दर ठरविणेसाठी निश्चीत करणेत येत आहे. खरेदीविक्री व्यवहाराप्रमाणे येणारे दर खालील प्रमाणे आहेत.

प्रस्तुत भूसंपादन प्रकरंणी संयुक्त मोजणी पत्रकातील नोंदी पाहता प्रस्तावीत क्षेत्रात पोट खराबा क्षेत्राचा समावेश आहे. संयुक्त मोजणी पत्रकाप्रमाणे एकूण 0.03.00 एवढे पोट खराबा क्षेत्र आहे. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांजकडील पत्र क्र. जा.क्र.नर/निवाडा शाखा/ पो.ख./धारणा कायम/2016/142 दिं. 19/10/2016 अन्वये कळविणेत आले प्रमाणे पोट खराबा जमिनीचे बाजारमुल्य परिगणित करताना बाजारमुल्य दर तक्त्यातील मार्गदर्शक सुचना प्रमाणे लागू करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जमिनच्या प्रकारानूसार पोटखराबासह सर्व क्षेत्र मुल्यांकनासाठी विचारात घेणेत आलेले आहे. त्यामुळे पोटखराबा जमिनीचा वेगळा दर निश्चीत करणेत आलेला नाही.

वरीलप्रमाणे सर्व ख़रेदी विक्री व्यवहार विचारात घेवून नविन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 मधील तरतुदीनूसार उच्चत्तम किंमतीचे तत्सम प्रतीचे निम्मे खरेदी विक्री व्यवहार विचारात घेवून सरासरी विक्री किंमतीच्या आधारे खालीलप्रमाणे दर निश्चित करणेत येत आहे.

**खरेदी विक्री व्यवहार पद्धतीने हिशोबित केलेले दर**

| अ.क्र. | प्रतवारी | प्रतीआर दर |
|---|---|---|
| 1 | खरीप | 51,478/- |
| 2 | वरकस | 27,083/- |
| 3 | अकृषिक | 75,000/- |

## 13B) शिघ्रसिध्द गणक पध्दतीने येणारा दर -

सह दुय्यम निबंधक वर्ग 2 सिंधुदुर्ग, यांचेकडून 01/01/2016 ते 31/12/2016 या कालावधीचे शिघ्रसिध्द गणकाचे दर व मार्गदर्शक सुची या कार्यालयाकडील पत्र क्र.उ.वि.अ/भूस/रा.म.मा.क्र.66/शि.सि.गणक/9/2016 दि.27/09/2016 अन्वये मागविणेत आलेले होते. सह दुय्यम निबंधक, यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सहदुनि/सिंधुदुर्ग/खरेदीविक्री/सुची2/373/16 दि.19/10/2016 अन्वये शिघ्रसिध्द गणकाचे दर नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक व महाराष्टर् राज्य पुणे यांचेकडील सन 2016 चे दर प्राप्त झाले. मौजे जांभरमळा, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग हा गाव शिघ्रसिध्द गणक तक्त्यात ग्रामीण क्षेत्रात विभाग 4 मध्यें मोडत आहे. जमिनदर निश्चीत करतेवेळी कलम 3(A) ची अधिसूचना प्रसिद झाली त्या वर्षाच्या शिघ्रसिद्ध गणक सुचीप्रमाणे दराचा विचार करणेत यावा अशी भूसंपादन कायदयात तरतूद असल्याने सन 2016 चे मुल्यांकन तक्त्याप्रमाणे विभाग मुल्य प्रकारानुसार सदरचा गांव मुल्य विभाग 4 मध्ये मोडत असल्याने हेक्टरी शेतसारा आकारणीनुसार जिरायत जमिनीच्या भातशेती/खरीप जमिनीस दिडपट, वरकस जमिनीस जिरायत जमिनीच्या 75% व बाजारमुल्य तक्त्यातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे हेक्टरी शेतसारा आकारमान मुल्यदानानुसार व जमिनीच्या प्रकारानुसार पोटखराबासह सर्व क्षेत्र मुल्यांकनासाठी विचारात घ्यावे असे सुचित करणेत आलेले आहे. त्याप्रमाणे पोटखराबा जमिनीस वेगळा दर देय करणेत आलेला नाही.

## शिघ्रसिध्द गणक दराप्रमाणे निश्चित केलेला दर

| अ.क्र. | गट क्रमांक | प्रति हेक्टरी शेतसारा | जमिनीचा प्रकार व दर प्रतिआर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | खरीप | वरकस | हायवे लगतचे दर | बिनशेती दर |
| 1 | 1 | 0 ते 1.25 | 3143 | 4715 | 2357 | 86000 | 75000 |
| 2 | 2 | 1.26 ते 2.50 | 3715 | 5572 | 2786 | 86000 | 75000 |
| 3 | 3 | 2.51 ते 5.00 | 4255 | 6383 | 3191 | 86000 | 75000 |
| 4 | 4 | 5.01 ते 7.50 | 5000 | 7500 | 3750 | 86000 | 75000 |
| 5 | 5 | 7.51 ते 10.00 | 6502 | 9753 | 4877 | 86000 | 75000 |
| 6 | 6 | 10.01 ते 12.50 | 7970 | 11955 | 5978 | 86000 | 75000 |
| 7 | 7 | 12.51 च्या पुढे | 9072 | 13608 | 6804 | 86000 | 75000 |

## तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | खरेदी विक्री व्यवहार पद्धतीने हिशोबित केलेले प्रती आर दर | | शिघ्रसिद्ध पद्धतीने हिशोबित केलेले प्रती आर दर | | या दोन्हीपैकी निवाडयात देय्य करणेत आलेला किफायतशीर दर (प्रती आर) |
|---|---|---|---|---|---|
| | खरीप | वरकस | अकृषिक | हायवे लगतचे | |
| 1 | 51,478/- | 27,083/- | 75,000/- | 86,000/- | 86,000/- |

जमिनीचे बाजारमुल्य ठरवितांना " The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act 2013" चे कलम 26 नुसार वरील मुल्यांकनापैकी सर्वाधिक येणारे बाजारमूल्य दर हा निश्चीत करणेकरीता मागील 3 वर्षाचे सरासरी खरेदीविक्री व्यवहार व सन 2016 मधील शिघ्रसिद्धगणकाचा दर यांची तुलना केली असता संपादित जमिन ही हायवेलगत व हायवेसाठी संपादित होत आहे. हायवेलगता जमिनीचा दर शिघ्रसिद्ध गणकानुसार येणारा रुपये 86,000/- प्रती आर हा दर खरेदी विक्री व्यवहार, जिरायत शेतजमिनीचा शिघ्रसिद्धगणकानुसार दर तसेच बिनशेती जमिनीचा दर या पेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. संपादित होणाऱ्या जमिनीत हायवेलगत असल्याने सदर हायवेलगतचा दर निवाडयामध्ये दर्शविणे योग्य वाटते त्यामुळे शिघ्रसिद्ध गणकानुसार हायवेलगत जमिनीचा दर्शविलेला दर रूपये 86,000/- हा संपादित जमिनीच्या मुल्यांकनासाठी बांजारमुल्य म्हणून प्रस्तावीत करणेत येत आहे.

# संपादित जमिनीचे अंतिम मुल्यांकन

भूसंपादन प्रस्ताव क्रमांक 17/2014

गांव - जांभरमळा ता- कुडाळ

| अ.क्र. | स.नं./हि.नं. | संपादित जमिनिचे क्षेत्र | | | | | आकार | पैकी पुरवणी 3D अधिसूचने द्वारे प्रसिद्ध क्षेत्र | संपादित जमिनीचा प्रती आर दर | संपादित जमिनीचा गुणांक 1.5 प्रमाणे प्रती आर दर | एकूण जमिनीची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खरीप | वरकस | अकृषिक | पो.ख. | एकूण | | | | | |
| 1 | 117/27 पै | | 0.16.00 | | | 0.16.00 | 0.05 | 0.16.00 | 86000 | 129000 | 2064000 |
| 2 | 124/12 | 0.00.20 | | | | 0.00.20 | 0.02 | 0.00.20 | 86000 | 129000 | 25800 |
| 3 | 124/13 पै | 0.01.30 | | | 0.00.30 | 0.01.60 | 0.09 | 0.01.60 | 86000 | 129000 | 206400 |
| 4 | 127/7 पै | 0.03.00 | | | 0.02.70 | 0.05.70 | 0.18 | 0.04.00 | 86000 | 129000 | 516000 |
| | | | | | | | | **0.21.80** | | | **2812200** |

## 14) फळझाडे मुल्यांकन -

प्रस्तूत प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या फळझाडांचे जागेवरील वस्तुस्थितीनुसार मुल्यांकन करून मिळणेकरीता या कार्यालयाकडील पत्र क्रमांक उविअ/भूसं/रा.म.मा.क्र.66/मुल्यांकने/05/2016, दि.05/05/2016 अन्वये तालुका कृषी अधिकारी, कुडाळ यांजकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. त्याप्रमाणे संपादित क्षेत्रातील फळझाडांचे मुल्यांकन करणेत येवून मागील निवाडयात समाविष्ट करणेत आले काही फळझाडांच्या नोंदी घेणेत न आलेबाबत हरकती अर्ज या कार्यालयात प्राप्त झाले सदरचे हरकती अर्ज या कार्यालयाकडील पत्र क्रं. भूसंपादन / राममा क्र.66/1066/2018 दि. 16/02/2018 अन्वये सदरचे हरकती अर्ज उपअधिक्षक भूमिअभिलेख यांजकडे पाठविणेत आले. त्यांचेकडील पत्र क्र. भूमापन/राममा66/जांभरमळा/2018/1190 दि. 25/05/2018 अन्वये पुरवणी संयुक्त मोजणी पत्रक प्राप्त झाले. कृषी विभागामार्फत फळझाडांचे मुल्यांकन करून निवाडयात खालील प्रमाणे समाविष्ट करणेत आले.

| अ.क्र. | स.नं./हि.नं/गट नंबर | संपादन येणाऱ्या फळझाडांची संख्या | | | | फळझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | फळ विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| 1 | 131/81 | बदाम | 1 | बदाम | 1 | 14975 |
| | | आंबा | 5 | आंबा | 5 | 207227 |
| | | जांभूळ | 2 | जांभूळ | 2 | 27158 |
| | | | | | | 249360 |
| 2 | 131/89 | नारळ | 5 | नारळ | 5 | 112456 |
| | | ज़ांभूळ | 4 | जांभूळ | 4 | 54315 |
| | | | | | | 166771 |
| | | | | | एकूण | 416131 |

## 15) वनझाडे मुल्यांकन -

प्रस्तुत प्रकरणी झालेल्या संयुक्त मोजणी नुसार त्यामध्ये समाविष्ट असलेल्या वनझाडांचे जागेवरील वस्तुस्थितीनूसार मुल्यांकन करून मिळणेकरीता या कार्यालयाकडील पत्र क्र.उविअ/भूसं/राममा-66/मुल्यांकन/05/2016, दि.05/05/2016 अन्वये वनक्षेत्रपाल कुडाळ यांजकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. तथापी या पुरवणी निवाडयात समाविष्ट असलेल्या क्षेत्रात वनझाडांचा समावेश नाही.

| अ.क्र. | स.नं./हि.नं/गट नंबर | संपादन येणाऱ्या वनझाडांची संख्या | | | | वनझाडांची मुल्यांकन अहवालाप्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | वन विभागाच्या मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | |
| | | झाडांचा प्रकार | संख्या | झाडांचा प्रकार | संख्या | |
| निरंक | | | | | | |

## 16) बांधकामे मुल्यांकन -

संपादीत जमिनीवरील बांधकामाचे मुल्यांकन त्यातील तज्ञ ॲथॉरिटी म्हणून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी यांजकडून या कार्यालयाकडील पत्र क्र. उविअ/भूस/रा.म.मा.क्र.66/मुल्यांकने/5/2016, दि.05/05/2016 अन्वये मुल्यांकन अहवाल मागविणेत आले होते. यापूर्वी घोषित करणेत आलेल्या निवाडा क्षेत्रातील काही बांधकामे चुकीने राहिल्याने उपअधिक्षक भुमिअभिलेख कुडाळ यांजकडील पत्र क्र. भूमापन राममा.क्र.66/जांभरमळा/2018/237 दि.7/02/2018 अन्वये पुरवणी सयुक्त मोजणी पत्रकारत

बांधकाम नोंदी घेण्यात आल्या. त्याचे मुल्यांकन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झालेले असून खालील प्रमाणे समाविष्ट करणेत आले.

### घरे व इतर बांधकामांचे किमतीचे प्रपत्रक

| अ.क्र. | स.नं./ हि.नं. | जमिन मालकाचे नांव | घर पत्रकाप्रमाणे घर मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामांची संख्या | | | | बांधकामाचे वर्ष | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संयुक्त मोजणी पत्रका प्रमाणे | | मुल्यांकन अहवालाप्रमाणे | | | |
| | | | | बांधकामाचा प्रकार | घर/गोठा नं./गडगा संख्या | बांधकामाचा प्रकार | घर/गोठा नं./गडगा संख्या | | |
| 1 | 119/4 | शिवराम जयराम सावंत वै.8 | मेघश्याम पांडूरंग कनयाळकर | गाळा | 1163 | गाळा | 1163 | | 151075 |
| 2 | 125क | कल्याणी गजानन लाड | कल्याणी गजानन लाड | आरसीसी इमारत | 1162 | आरसीसी इमारत | 1162 | | 4877252 |
| | | | | | | | | | 5028327 |

## 17) विहिरींचे विंधन विहिरींचे मुल्यांकन :-

या निवाडयाव्दारे संपादित करणेत आलेल्या क्षेत्रामध्ये विहिरी/विंधन विहिरीं नाहीत.

| अ.क्र. | स.नं./ पो.हि.नं. | जमिन व विहिरी मालकाचे नांव | संपादन क्षेत्रात येणाऱ्या बांधकामाची संख्या | | बांधकाम वर्ष | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | संयुक्त मोजणी प्रमाणे विहिरींची संख्या | मुल्यांकन अहवालाप्रमाणे विहिरींची संख्या | | |
| निरंक | | | | | | |

## 18) धार्मिक मालमत्ता :-

संपादीत जमिनीमध्ये मौजे - जांभरमळा येथील धार्मिक मालमत्ता/ जमिन संपादित होत नाही.

| अ.क्र. | मौजे | अवार्ड प्रपत्र ई अ.क. | मालमत्तेचा प्रकार | स.नं. | संपादीत क्षेत्र | स्टेटमेंट ई प्रमाणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| निरंक | | | | | | |

## 19) शासकीय जमीन :-

सदर प्रकरणातील मौजे जांभरमळा येथील संपादीत होणाऱ्या जमिनी सरकारी मालकी दर्शविलेली बाब स.मो. अहवालाप्रमाणे संपादित होत नाही.

| अ.क्र. | स.नं. | तपशील | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| निरंक | | | | |

## 20) पोटखराबा जमिनीचे मुल्यांकन :-

अंतिम निवाडयात प्रपत्र ई प्रमाणे संपादनाखालील जमिनीमध्ये येणाऱ्या पोटखराबा क्षेत्रासाठी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांजकडील पत्र क्र. जा.क्र.नर/निवाडा शाखा/ पो.ख./धारणा कायम/2016/142 दिं. 19/10/2016 अन्वये कळविणेत आले प्रमाणे पोट खराबा जमिनीचे बाजारमुल्य परिगणित करताना बाजारमुल्य दर तक्त्यातील मार्गदर्शक सुचना प्रमाणे लागू करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जमिनीच्या प्रकारानुसार पोटखराबासह सर्व क्षेत्र मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात आलेले आहे. पोटखराबा जमिनी अभिलेख व स्थळ पहाणीनुसार निश्चीत करणेत आलेल्या आहेत.

## 21) कुळ आणि मालक:-

जमिनीच्या मालकी बाबत कोणाचीही तक्रार नाही. त्यामुळे तसेच गांव नमुना 7/12 पाहता सदर संपादन जमिनीमध्ये कोणीही कुळ नसल्याचे दिसून येते. जमिनीची मालकी 7/12 प्रमाणे मान्य करणेत आली आहे. आणि त्यानुसार मोबदला रक्कम निवाडा पत्रकामध्ये हिशोबित करून देय करणेत येईल.

## 22) संपादित जमिनीचा ताबा :-

संपादित जमिनीचा ताबा संपादन संस्थेने घेतलेला नाही. त्याजमिनीचा ताबा अंतिम निवाडयानंतर संपादीत संस्थेस ताबा देण्याची कार्यवाही कलम 3H (1) प्रमाणे करणेत येईल.

## 23) 100% दिलासा रक्कम :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकारी व स्थानांतरण पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम 2013 मधील कलम 30(1) नुसार देय संपादन मोबदला रकमेवर 100% दिलासा रक्कम हिशोबित करून देय करणेत आलेली आहे.

## 24) संपादन क्षेत्रासाठी बाजार मुल्याचा गुणक घटक (Multiplier Factors) :-

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार/अ दि. 26 मे, 2015 अन्वये उक्त अनुसूचीच्या नोंद (2) व (3) मध्ये अनुक्रमे ग्रामीण क्षेत्राच्या बाबतीत ज्या घटकाद्वारे बाजार मुल्य गुणले जाणार आहेत ते घटक, महाराष्ट्र शासनाने अधिसूचीत करणेत आलेले आहे. नगररचनाकार सिंधुदुर्ग यांजकडे गुणांकाबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. उविअ/भूस/एनएच-66/गुणांक/2018 दि.19/04/2018 अन्वये अभिप्राय मागविणेत आलेले होते. त्यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. भूसंपादन/कुडाळ/राममा क्र.66/गुणांक/नरसी/989 दि. 17/05/2018 अन्वये मौजे जांभरमळा हा गांव मंजूरप्रादेशिक योजने अंतर्गतच्या सिंधुदुर्ग पर्यटन विकास आराखडयामध्ये राष्ट्रीय महामार्गालगतचे क्षेत्र पर्यटन विभाग T-3 या जमिन वापर विभागात समाविष्ट् आहे. सदर जमिन वापर विभागात नियमावलीतील रहिवास/ वाणिज्य वापर अनुज्ञेय होतो. सदर गावच्या राष्ट्रीय महामार्गालतच्या संपादित जमिनीच्या नुकसान भरपाईसाठी गुणांक 1.50 इतका राहिल असे कळविण्यात आल्याने सदरच्या निवाडयात गुणांक 1.50 वाढ देवून येणारा दर निवाडयामध्ये लागू केलेला आहे.

## 25) अतिरिक्त घटक मोबदला :-

भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुन:स्थापना आणि पुनर्वसन अधिनियम 2013 मधील कलम 30 (3) नुसार प्रस्तूत भूसंपादन प्रकरणी कलम 3(A) अधिसूचना भारत सरकार नवी दिल्ली राजपत्र असाधारण भाग II खंड 3 - उपखंड (ii) अन्वये दि.16/12/2016 मध्ये प्रसिद्ध झालेली असून अंतिम प्रसिद्धी 14/03/2017 रोजी झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त नवीन भुसंपादन अधिनियम 2013 मधील कलम 30(3) व भारत सरकार, Ministry of Road Transport & Highway यांजकडील पत्र क्रमांक No.NH-11011/30/2015LA दि.28/12/2017 (GUIDELINES) नुसार प्रसिद्धीच्या दिनांकापासून निवाडयाच्या तारखेपर्यंत म्हणजेच 14/03/2017 ते 31/08/2018 पर्यंत एकूण 535 दिवस जमिनीच्या मुळ किंमतीवर येणाऱ्या बाजार मुल्यावर 12% अतिरिक्त घटकांची रक्कम हिशोबित करणेत आलेली आहे.

## 26) मालकी हक्क :-

संपादीत होणाऱ्या जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी संबंधीत जमिनीच्या अधिकार अभिलेखातील (7/12) नोंदी ग्राहय धरण्यात आल्या आहेत. मालकी हक्क व नुकसान भरपाई बाबत काही हरकती निर्माण झाल्यास त्यावर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 एच (4) प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. उक्त अधिनियमाचे कलम 3D व संयुक्त मोजणीचे वेळी मालकी हक्काबाबतचे दस्त ऐवज विचारात घेण्यात आले आहेत. तथापि कांही मालमत्ते संदर्भात मालकी हक्क शाबितीचा वाद उद्भवल्यास मालकी हक्काबाबत सक्षम न्यायालय जो आदेश देईल त्या आदेशा नुसार संबंधितांना नुकसान भरपाई वाटप करण्यात येईल. संपादीत जमिन ही खुद्द मालकीची आहे ज्यांना नुकसान भरपाई वाटप केलेले आहे. त्यांच्याकडून संपादीत जमिनीचा ताबा घेण्यांत येवून त्यांच्या मालकी हक्कामधुन 7/12 उताऱ्यावरून संपादीत क्षेत्र कमी करून सदरचे संपादीत क्षेत्र केंद्र शासनाकडे (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण) वर्ग करण्यात यावे. त्या बाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील व तशी नोंद 7/12 उताऱ्यावर हितसंबधीतांचे मालकी हक्कात घेण्यात यावी.

सदरील जमीनीवर बँकाचे कर्ज, तारण जप्ती इत्यादी आदेश नोंद केलेले आहेत व अशा संस्थांनी वसुली संदर्भात आपले दावे दाखल केलेले आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई वसुली पात्र रक्कम प्रथम प्राधान्याने वसुल केली जाईल याची उपाययोजना करण्यात येईल.

ज्या जमिनींचे 7/12 उताऱ्यावर बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहार शर्तभंग इत्यादी नोंदी आहेत, अशा जमिनीची नुकसान भरपाई संबंधित तहसीलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र अथवा अशा नोंद कमी झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्यात यावी. नवीन शर्तीच्या जमिनीची नुकसान भरपाई शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे नजराणा रक्कम वसुल करून उर्वरित रकमेचे वाटप करावे व कपात केलेली रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी. तसेच इनाम जमीनी बाबत मावेजा वाटप करता येणार नाही. नियमाप्रमाणे आवश्यकती कार्यवाही करावी.

संयुक्त मोजणी प्रमाणे संपादीत क्षेत्र खाजगी व्यक्तीने धारण केले आहे. या बाबत उपअधिक्षक , भूमी अभिलेख व अधिकार अभिलेख यांच्याकडून खात्री करण्यात आली आहे. तथापी संपादन पैकी कांही क्षेत्र यापूर्वी महामार्ग अथवा इतर शासकीय कारणासाठी संपादीत झालेली आहे, याबाबत कोणताही पुरावा उपलब्ध झाला तरी देखील आज रोजी अशा जमिनी संदर्भात मोबदला वाटप करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे अशा जमिनींचे बाबतीत मोबदला

वाटप संबंधित जमीन धारकाने संपादनाबाबतची माहिती न देता स्विकारल्यास ते संबंधिताकडून वसुल करण्यास पात्र राहील.

**27) आस्थापना सेवा शुल्क 1.5% प्रमाणे आकारणी :-**

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत 1.5% आस्थापना रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. संकिर्ण-01/2018 प्र.क्र.-11/अ-2 दि. 04/04/2018 मधील तरतूदीनुसार.)

**28) सोयी सुविधा खर्च 1% प्रमाणे आकारणी :-**

सदर प्रकरण राष्ट्रीय महामार्ग, भारत सरकार यांचे असलेमुळे संचिकेत 1% सुविधा खर्च शुल्क रक्कमेची आकारणी निवाडयात करणेत आलेली आहे. (महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. संकिर्ण-01/2018 प्र.क्र.-11/अ-2 दि. 04/04/2018 मधील तरतूदीनुसार.)

## 29) नुकसान भरपाई :-

या निवाडयाच्या निवाडा पत्रकामध्ये (प्रपत्र - ई मध्ये) नमुद केल्या प्रमाणे संपादित क्षेत्राची गट/स.नं. निहाय नुकसान भरपाई खालील प्रमाणे निश्चीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | **संपादीत निवाडा जमिनीचे एकुण क्षेत्र हेक्टर आर.** | 0.21.80 |
| ब | **<u>जमिनीची मुळ किंमत कलम 26(1) प्रमाणे</u>**<br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषीक, संभाव्य अकृषीक इ. प्रमाणे रक्कम | 18,74,800.00 |
| क | **<u>जमिनीची मुळ किंमत कलम 26(2) गुणक 1.50 प्रमाणे</u>**<br>जिरायत, बागायत, हंगामी बागायत, हायवेवरील, अकृषीक, संभाव्य अकृषीक इ. प्रमाणे रक्कम | 9,37,400.00 |
| | **एकूण (ब+क)** | 28,12,200.00 |
| 1 | बांधकामाचे मुल्य :- घर/गोठा/दुकाने/मंदिर/पाण्याचे हौद/टाकी इत्यादी | 50,28,327.00 |
| 2 | विहीरींचे मुल्यांकन | -- |
| 3 | विंधन विहीरींचे मुलयांकन | -- |
| 4 | वनझाडांचे मुल्यांकन | -- |
| 5 | फळझाडांचे मुल्यांकन | 4,16,131.00 |
| | **एकूण (1 ते 5)** | 54,44,458.00 |
| 6 | कलम 27 प्रमाणे एकूण रक्कम | 82,56,658.00 |
| 7 | 100% सोलेशियम (दिलासा रक्कम) | 82,56,658.00 |
| 8 | 12% रक्कम कलम 30(3) प्रमाणे (कलम 3A पासून निवाडा दिनांकापर्यंत दि.14/03/2017 पासून दि.31/08/2018 पर्यंत म्हणजे 535 दिवस) | 3,29,759.34 |
| | एकूण (6 ते 8) | 1,68,43,075.34 |
| | **पुर्णांकात एकूण रक्कम** | 1,68,43,075.00 |
| | **महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. संकिर्ण-01/2018 प्र.क्र.-11/अ-2 दि. 04/04/2018 मधील तरतूदी नुसार** | |
| 9 | 1.5% आस्थापना खर्च रक्कम राज्यशासनास जमा करणेसाठी | 2,52,646.00 |
| 10 | 1% सोयी सुविधा खर्चाची रक्कम भुसंपादन अधिकारी यांच्याखात्यामध्ये जमा करण्यासाठी | 1,68,431.00 |
| | **एकूण बेरीज** | 1,72,64,152.00 |

**सोबत निवाडा प्रपत्रक (अक्षरी रक्कम रूपये:- एक कोटी बहात्तर लाख चौसष्ट हजार ऐकशे बावन मात्र)**

## 30) मोबदला वाटप प्रक्रिया :-

यांप्रमाणे निर्धारित करणेत आलेली निवाडा रक्कम राष्ट्रीय महामार्ग कायदयाच्या कलम 3H (1) मधील तरतूदीप्रमाणे केंद्रशासनाद्वारे सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करावी. याप्रमाणे निवाडा रक्कम सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा केल्यावर उक्त अधिनियमाच्या कलम 3H (2) अन्वये सक्षम प्राधिकारी केंद्रशासनाच्या वतीने या निवाडयाद्वारे संपादित करण्यात आलेल्या क्षेत्रातील पात्र हितसंबंधित व्यक्तिंना त्याच्या क्षेत्रा व हिश्यानुसार रक्कमेचे वाटप करतील व त्यांचेकडुन संपादित क्षेत्राचा ताबा घेतील. भुसंपादन मोबदला रक्कम वाटप करताना संपादित होणाऱ्या क्षेत्राच्या मालकीबद्दल अथवा मोबदला रक्कमेतील हिश्याबद्दल वाद निर्माण झाल्यास प्रमुख जिल्हा न्यायालय (The principal civil court of original jurisdiction within the limits of whose jurisdicition the land is situated) यांचकडे उक्त अधिनियमाच्या कलम 3H (4) नुसार त्यांचे निर्णयासाठी मोबदला रक्कम भरता येईल.

## 31) जमीनीचा ताबा :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियमाच्या कलम 3E (1) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी संपादित जमिनीच्या हितसंबंधितास हा निवाडा घोषित केल्यावर मोबदला रक्कम स्विकारणेसाठी व त्याचवेळी संपादित मिळकतीचा ताबा केंद्रशासनास हस्तांतरीत करणेकरिता लेखी नोटीसीद्वारे कळवतील. अशा नोटीसीची बजावणी झालेवर एकूण 60 दिवसाच्या कालावधीत जर हितसंबंधित व्यक्तिनी ताबा हस्तांतर केला नाही तर उक्त अधिनियमाच्या कलम 3E (2) प्रमाणे जिल्हाधिकारी यांना ताबा प्राप्त करणेकरीता सक्षम प्राधिकारी विनंती करतील. व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सक्षम प्राधिकारी यांना अथवा त्यांचेद्वारे प्राधिकृत व्यक्तीस ताबा हस्तांतरीत केला जाईल.

## 32) जमिनीचा वापर:-

संपादन करण्यात आलेली जमिन ही राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्यात आलेली आहे. या संपादनाखालील ज्या जमिनींना वनसंबधित कायद्याच्या तरतुदी लागू आहेत अथवा इतर कायद्यांच्या किंवा न्यायालयाच्या आदेशाद्वारे वापरातील बदलास निर्बंध लागू आहेत. या बाबतीत भूसंपादनानंतर अनुज्ञेय वापर सुरू करण्यापूर्वी वनविभाग अथवा त्या-त्या परिस्थितीतील निर्बंध असणाऱ्या विभागातील सक्षम स्तरावरून वापरातील निर्बंधाबाबत परवानगी घेवूनच संपादित करण्यात आलेल्या अशा मिळकती हया ज्या प्रयोजनासाठी संपादित केल्या आहेत त्या प्रयोजनसाठी वापर करण्यास पात्र ठरतील. अशा प्रकरणांमध्ये सक्षम स्तरावरून अनुज्ञेय वापरात बदल करून घेण्याची

जबाबदारी संपुर्णत: संपादन संस्था म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांची राहील म्हणजेच या भुसंपादन प्रक्रियेद्वारे संपादित जमिनींची केवळ मालकी (Title) संपादन संस्थेकडे कायदेशिरपणे हस्तांतरीत केली जात आहे. व त्याच्या वापरादरम्यान वनसंवर्धन कायद्याच्या तरतूदींचा भंग होणार नाही यांची जबाबदारी संपादन संस्थेची राहील.

## 33) विश्लेषण:-

ज्याअर्थी वरील परिच्छेद क्रमांक 29 मध्ये **मौजे जांभरमळा ता. कुडाळ** येथील संपादनाचे क्षेत्र व त्याअनुषंगाने कायदयातील तरतुदी विचारात घेता परिगणित करण्यात आलेली जमिन व तिच्याशी निगडीत जंगलीझाडे व फळझाडे यांच्या मोबदल्याचा एकत्रित सारांश दर्शविण्यात आलेला आहे. तसेच या निवाडयासोबत जोडलेल्या निवाडा पत्रकामध्ये संपादित होणाऱ्या सर्व्हे नंबर / गट नंबर निहाय विस्तृतपणे अनुज्ञेय मोबदल्याचा तपशिल विषद करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3 G (1) प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून केंद्रशासनाने संदर्भिय क्रमांक 1 नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून उक्त कायद्याच्या कलम 3 डी नुसार **मौजे जांभरमळा ता. कुडाळ** येथील संपादित करण्यात आलेल्या मिळकतींचा निवाडा या आदेशाद्वारे घोषित झाला आहे असे जाहिर करण्यात येत आहे. ज्याअर्थी हा निवाडा घोषित करण्यात आला आहे त्याअनुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम 3 (E) व 3 (H) प्रमाणे सर्व हितसंबंधीतांस नोटीसा देण्यात याव्यात. ज्याअर्थी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 च्या कलम 3G प्रमाणे हा निवाडा जाहिर झाला असुन अंतिमत: संपादित जमिनीवरील सर्व हितसंबधी यांचे/ खातेदारांचे सर्व हक्क संपुष्टात येवून ही मिळकत त्या मिळकतीवर असलेल्या सर्व झाडे, इतर मालमत्तांसह तसेच संपुर्ण बोजा विरहित व भारमुक्त (Free From all Encumbrances) होऊन केंद्र शासनाच्या सडक व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे नांवे निहित करणेत येत आहे. तसेच ज्या अर्थी या निवाडयाद्वारे संपादित जमिन ही सर्व भार मुक्त होऊन केंन्द्र शासनाचे वरील मंत्रालयाचे नांवे विहित करणेत आली आहे. त्याअर्थी सदर जमिनींच्या आज रोजी पर्यन्त अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारचा जमिन महसुल कमी करणेची कार्यवाही करणेचा म्हणजेच सारा माफीचा आदेश देखील याद्वारे देण्यात येत आहे.

## आदेश

यान्वदारे जाहिर करण्यात येत आहे की,

1) मौजे **जांभरमळा ता. कुडाळ** जिल्हा सिंधुदुर्ग येथील राष्टीय महामार्ग अधिनियम, 1956 चे कलम 3D अंतर्गत अधिसुचित एकुण 0.21.80 हे.आर. एवढे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम 3G नूसार निर्धारित करण्यात आलेल्या रक्कम - 1,72,64,152.00 (एक कोटी बहात्तर लाख चौसष्ट हजार एकेश बावन मात्र) एवढया मोबदल्याच्या विनिमयात अंतिमत संपादित करणेत आले आहे.

2) सर्व खातेदारांस/ हितसंबधीयास उक्त अधिनियमाच्या कलम 3E व 3H नुसार लेखी नोटीसा देवून याबाबत कळविणेत यावे.

3) एकुण निवाडयात नमुद आस्थापना रक्कम रू.**2,52,646.00 (दोन लाख बावन हजार सहाशे सेहेचाळीस मात्र )** शुल्क सक्षम प्राधिकारी यांनी शासनास जमा करावे.

4) निवाडयाच्या रक्कमेच्या एकूण 1 टक्के सोईसुविधा शुल्क रक्कम रू.**1,68,431.00 (एक लाख अडूसष्ट हजार चारशे एकतीस मात्र )** सक्षम अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांच्या खात्यात जमा करावी.

5) या निवाडयाद्वारे घोषित क्षेत्राच्या अधिकार अभिलेखात भोगवटादार सदरी संपादन संस्था म्हणजेच सडक व् परिवहन मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे नांवे संपादित क्षेत्रापुरते दाखल करण्यात यावे.

6) उक्त अधिनियमाच्या कलम 3(E) व 3(H) नुसार पुढील नोटीसा प्रक्रिया पुर्ण केल्यावर म्हणजेच भुसंपादन मोबदला देवू केल्यावर (Offer) वितरण (Disburesement) आणि कायद्यात व त्या अनुषंगाने या निवाडयात निर्दिष्ट ताबा प्रकिया पुर्ण केलेवर, सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयामार्फत **मौजे जांभरमळा ता. कुडाळ** येथील उक्त अधिनियमाचे कलम 3A व 3D नुसार प्रसिद्ध करणेत आलेल्या अधिसुचना या घोषित निवाडयाची प्रत आणि विधीवत घेण्यात आलेल्या ताबे पावत्यांच्या सह कमी जास्त पत्रक करणेकामी उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी कमी जास्त पत्रक पारीत करून पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय महसुल विभागाकडे सादर करावे. कमी जास्त पत्रकाचा अधिकार अभिलेखात अमंल दिल्यावर गांव नमुना नं.7/12 संपादन संस्थेस सशुल्क उपलब्ध करून देण्याची जबाबदारी क्षेत्रीय महसुल यंत्रणेची राहील.

निवाडा पत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक जमिनीची नुकसान भरपाई संबंधीतास मालकी हक्क व इतर आवश्यक बाबी तपासून अदा करावी. नुकसान भरपाई वाटप व जमिनीचा ताबा घेण्यासाठी सर्व संबंधीतांना वैयक्तीक नोटीसा कलम 3(E) व 3(H) अन्वये

देण्यात याव्यात व जमिनीचा कायदेशीर ताबा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 मधील तरतूदीनुसार सक्षम प्रधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) कुडाळ यांजकडे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे देण्यात यावा असा आदेश करण्यात येत आहे. अंतिम निवाडा राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 कलम 3 G (1) अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक 31/08/2018 रोजी देण्यात येत आहे.

ठिकाण :- कुडाळ

दिनांक :- 31/08/2018

(विकास सुर्यवंशी)

सक्षम प्राधिकारी तथा

उपविभागीय अधिकारी, (महसूल) कुडाळ